Impact Factor 6.261 ISSN- 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOW ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

UGC Approved Multidiciplinary international E-research journal

**PEER REFREED & INDEXED JOURNAL**

April - 2018
2019

Chief Editor
Dr. Dhanraj T. Dhangar
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce college,
Yeola, Dist. Nashik (M.s.) India

Prof. Tejesh Beldar, Nashikroad (English)
Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)
Mr. Bharati Sonawane - Nile, Bhusawal (Marathi)
Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)
Dr. Munaf Shaikh, Jalgaon (Urdu)

4

Visit to - www.researchjourney.net SWATIDHAN PUBLICATION

Scanned with OKEN Scanner

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | ISSN- 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) –0.676 Special Issue – 130 (B) | April 2019 | UGC Approved No. 40705

# Index


1. Unravelling the Sufferings and Struggles of Dalit Women:Bama's Sangati — 1
**Vandana Sharma, Dr.Sunita Rani**
2. Partition Literature in English in India — 4
**More J. G.**
3. Organization Management And MBO : An Overview — 6
**Dr Padmapani Bhagwan Sawai**
4. Impact of FDI in India — 9
**Syed Vazeer Syed Isa**
5. **Various constitutional aspects regarding Article 356 – A Critical Analysis** — 12
**By Mrs.Veena Ingle**
6. Types of Emergencies under The Indian Constitution — 16
**Prof. Geeta Girwalkar (Sharma)**
7. Gills Rot Disease Of Freshwater Fish Labeo Rohita From Ghami Reservoir, Latur Disrict (M.S.) India — 19
**Pathan A.V.**
8. Working Women's role and social change in kalaburagi city — 21
**Dr shambunath**
9. Comparative Study On Stress Among Women Politicians Of Hyderabad Karnataka Region — 25
**Sandeep Dashrat., Prof. S.P.Melkeri.**
10. मराठवाड्यातील मानवी विकास : शैक्षणिक वास्तविकत्तेवर दृष्टीक्षेप — 28
**प्रा.डॉ.एन.एन.मुंढे**
11. भारतातील प्राचीन न्यायव्यवस्था : एक अभ्यास — 33
**डॉ. गोलेकर कल्याण मच्छिंद्र**
12. भारताच्या अंतर्गत सुरक्षेपुढील आव्हाने — 37
**प्रा.डॉ.दयानंद माधवराव गुडेवार**
13. संत स्त्रियाच्या काव्यातून प्रकट झालेले स्त्र–पुरूष नातेसंबंध — 39
मेनका बा. धुमाळे
14. स्त्री शिक्षण व मानवी हक्क - यावल तालुक्याचा क्षेत्रीय अभ्यास — 42
**प्रा. डॉ. अशोक खाचणे**
15. 'लीळाचरित्र' ग्रंथातून चक्रधर स्वामींनी सांगितलेला उपदेश — 45
**डॉ. सूर्यवंशी रामहरी मधुकर**
16. दहशतवाद : राजकीय व सामाजिक परिणाम — 47
**प्रा.डॉ.संतोष गुणवंतराव पाटील.**
17. ग्रामीण भागातील पायाभूत सुविधा-ग्रामीण रस्त्याचे महत्त्व — 49
**वसंत नथु हिस्सल**
18. ओमप्रकाश वाल्मीकि की कविताओं में वेदना और निराशा — 52
डॉ. गजानन हरीराम बने
19. सुर्यकांत त्रिपाठी निराला की कविता में सार्वभौमिकता — 54
**प्रा.डॉ.कदम एस.एस.**
20. व्यवसायाचे समाजिक उत्तरदायित्त्व — 56


Scanned with OKEN Scanner

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | ISSN- 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF ) - 3.452, (GIF) –0.676 Special Issue – 130 (B) | April 2019 | UGC Approved No. 40705

# भारतातील प्राचीन न्यायव्यवस्था : एक अभ्यास

Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth, Dist. Parbhani

**डॉ. गोलेकर कल्याण मच्छिंद्र**
सहाय्यक प्राध्यापक, कै. रमेश वरपुडकर महाविद्यालय, सोनपेठ, जि. परभणी

---

**प्रस्तावना**

भारताचा प्राचीन कालखंड इ.स. 01 पासून ते इ.स. 1206 पर्यंतचा मानला जातो. प्राचीन कालखंडाबाबत अनेक मतभेद असले तरी हा कालखंड सर्वमान्य मानला जातो. कारण इ. स. 01 मध्ये येशू ख्रिस्ताचा जन्म झाला आणि त्याच्या जन्मापासून इ.सनास सुरूवात झाली. भारतातील सन 1206 पर्यंतचा मुस्लिम राजवटीचा कालावधी प्राचीन कालावधी म्हणून ओळखला जातो.

मानवाचा प्राचीन इतिहास लिहिण्यासाठी वाङ्मयीन किंवा भौतिक साधने उपलब्ध नसतात तेव्हा त्या काळाला इतिहासपूर्व काळ असे म्हटले जाते. तर ज्या काळापासून इतिहास लिहिण्यासाठी आवश्यक साधनसामुग्री उपलब्ध असते. तेव्हापासून ऐतिहासिक काळाचा आरंभ इ ाला असे मानले जाते. इतिहासपूर्व काळातील मानवास आदिमानव असे संबोधले जाते. आदिमानव या कालखंडात पाषणाचा (दगड) प्रमुख उपयोग करीत होता. त्यामुळे त्या काळाला अश्मयुग असे म्हटले जाते. भारतात मानवी जीवनाचा सामाजिक , सांस्कृतिक, ऐतिहासिक व राजकीय अभ्यास करतांना पाषाण युगाचे साधारण दोन भाग पाडले जातात. एक-पुरातन पाषाण युग, दोन-नूतन पाषाणयुग.

पुरातन पाषाणयुगातील भारतीय मानव नग्नावस्थेत राहत असे. कालांतराने तो लज्जा रक्षणासाठी व उष्णता आणि थंडी पासून संरक्षणासाठी झाडाच्या साली व प्राण्यांच्या कातडीचा वस्त्र म्हणून वापर करू लागला. आपला उदरनिर्वाह भागवण्यासाठी तो प्राण्यांची शिकार करीत असे. पशुपक्षांचे मांस, कंदमुळे, फळे, वृक्षवल्लींची पाने हा त्याचा आहार होता. हा मानव, चप्रथम तो एकटा किंवा नरमादी अशा जोडीने शिकारीसाठी भटकत होता.छ काही कालावधीनंतर पाषाण युगातील मानवाच्या गरजा वाढल्या. कारण लोकसंख्या वाढत गेली. त्यांच्या अन्नाची गरज वाढली तसेच अधिक अन्न प्राप्त करण्यासाठी सामुदायिक शिकारीची आवश्यकता भासू लागली. तसेच अधिक अन्नासाठी त्याला धाडसी कामे करण्याची गरज भासू लागली. यातूनच तो मानवी समुदायाच्या वेगवेगळया टोळया करून राहू लागला. या टोळयांच्या नियंत्रणासाठी व केलेल्या शिकारीचे मांस वाटून घेण्यासाठी काही नियम तयार केलेले असावेत. साधारणपणे हे नियम अनुभवी किंवा टोळीतील वृध्द व्यक्तिनेच केलेले असावेत त्यांची अमलबजावणी व्यवस्थित होते किंवा नाही हे देखील हीच वयोवृध्द माणसे काम पहात असावीत म्हणजेच टोळीतील संघर्ष मिटवणे, शिकारीचे नियम तयार करणे याच बरोबर त्याबाबत काही वाद उत्पन्न झाल्यास न्यायनिवाडा करण्याचे कामही वयोवृध्द मंडळी करीत असत किंवा टोळीचा नायक हा न्यायनिवाडा करण्याचे काम करीत असे. अती प्राचीन काळातील न्यायव्यवस्था कशी असावी याचे फारसे ठोस पुरावे मिळत नाहीत, आपणास फक्त अनुमान काढता येतो. पाषाण युगातील मानव शिकारीसाठी समुदाय करून राहू लागला म्हणजेच त्याला टोळीच्या नायकाच्या आज्ञा पाळाव्या लागल्याच असतील तेव्हा पाषाण युगातही टोळी नायकाच्या आज्ञांमध्ये न्यायाची उत्पत्ती, उगम झालेला दिसतो. या बाबत मा. म. देशमुख म्हणतात, चमानव भक्ष्याच्या शोधार्थ अधिक धाडसाची कामे करण्यासाठी तो टोळी करून राहू लागला. टोळीच्या नायकाची आज्ञा पाळू लागला.छ कालांतराने तो अन्नाचा संचय देखील करू लागला. त्यामुळे त्याच्या जीवनाला कमी अधिक स्थिरता प्राप्त झाली तसेच त्याच्यात धर्मसंकल्पनेची निर्मिती झाली पण त्याची ही धर्म संकल्पना रानटी स्वरूपाचीच होती. तो शिकारीसाठी व अन्य कार्यासाठी भूताटकी, जादुटोणा यांचा वापर करत होता. असे कार्य करणारे प्रत्येक टोळीत एक किंवा एकापेक्षा जास्त लोक असतील त्यांच्या अज्ञांचे पालन सर्वांना करावे लागत असे. काही गुंतागुंतीच्या प्रश्नात त्यांचा निर्णय अंतिम मानला जात असे, म्हणजेच पाषाण युगातच धर्माची निर्मिती होऊन टोळी नायक किंवा जेष्ठ व्यक्ती धर्मनिरपेक्ष न्यायाधीश म्हणून काम करीत असावा. यावरून पाषाण युगातच न्यायालयांची उत्पत्ती झालेली दिसते. पाषाण युगातील धर्म म्हणजेच ती एक प्रकारे न्यायव्यवस्था होती मात्र ती रानटी स्वरूपाची होती.

नुतन पाषाण युगात मानवाची प्रगती पाषाण युगापेक्षा अधिक प्रमाणात झाली होती. अनेक शोध लागले होते त्यामुळे त्याचे जीवन प्रगत झाले, तो एकाच जागेवर कायम निवास करू लागला. शेतीचा शोध, मासेमारी, पशुपालन यासारख्या बाबींचा विकास होऊन स्थायी मानवी वसाहती मोठ्या प्रमाणात वाढल्या, टोळयाचे रूपांतर गावागावात झाले. मा. म. देशमुख म्हणतात, चगावा गावात वस्तु विनिमयाच्या स्वरूपाचा व्यापार सुरू झाला. त्याचप्रमाणे शिकार, सरहद्द वगैरे कारणावरून गावागावात संघर्ष सुरू झालेछ गावागावात अनेक कारणांवरून संघर्ष निर्माण झाले असतील तर हे संघर्ष मिटवण्यासाठी कोणती तरी यंत्रणा अस्तित्वात असली पाहिजे. म्हणजेच नुतन पाषाण युगातही न्याययंत्रणा अस्तित्वात होती. ती पुरातन पाषाणयुगापेक्षा आधुनिक व कार्यक्षम असावी. साधारण जशास तसे अशा स्वरूपाची न्यायव्यवस्था असावी. मात्र पुरातन पाषाण युगातील धर्मसंकल्पना जशी रानटी होती तशी नूतन पाषाण युगातील धर्मसंकल्पना रानटी नव्हती. चत्यांच्या धर्म संकल्पनातही अनेक बदल झालेत.छ यावरून नवपाषाण युगातील न्यायव्यवस्था प्राचीन पाषाणयुगापेक्षा प्रगत होती हे स्पष्ट होते.

धातु युगातील मानवी जीवन दोन्ही पाषाणयुगापेक्षा आधिक सुधारलेले होते. तेव्हा या काळातील न्यायव्यवस्था देखील अधिक प्रगत इ ालेली असावी. जसजशी सामाजिक व्यवस्था व अर्थिक परिस्थितीत बदल होत गेला तसा न्यायव्यवस्थेतही बदल होत राहिला. आदिमानव



Scanned with OKEN Scanner

काळातील बऱ्याच व्यवस्था धर्मावर आधारित राहिल्या त्यामुळे धर्म हा न्यायाचा पर्याय राहीला आहे. केवळ धर्म म्हणजे न्याय असे मानले जात नव्हते. धर्माची व्याप्ती खूप मोठी असे. या कालखंडानंतर कालखंड येतो तो सिंधू संस्कृतीचा.

सिंधू संस्कृतीमधील राजकीय जीवनाची स्पष्ट अशी माहिती मिळत नसली तरी तिच्या काही वैशिष्टयावरून ती एक प्रगत संस्कृती होती हे सिध्द होते. त्यामुळे समाजजीवन नियंत्रित करण्यासाठी समाजात काही वर्ग पाडलेले असावेत असा अंदाज व्यक्त केला जातो. या बाबत प्र. का. चौधरी म्हणतात, ‟तेथील संस्कृती वर्गाधिष्ठीत होती. या समाजात श्रेष्ठ कनिष्ठ, स्पृश्य अस्पृश्य, हीन ही भावना नसावी. व्यवसायानुसार त्यांचे स्थान असावे. पहिला वर्ग उपाध्यायांचा असावा. तत्कालिन समाजात त्यांना धर्मगुरू म्हणता येईल. विद्वान ज्ञानी, अनुभवी, वृध्द, मुत्सदी, चतूर व्यक्तीची निवड उपाध्याय म्हणून केली जात असावी. याचे प्रमाण अत्यल्प असावे. मुख्य उपाध्याशिवाय सहायक निवडले जात असावेत.” जो पहिला वर्ग आहे तोच न्यायधिश म्हणून काम पहात असावा कारण त्यालाच धर्मगुरूही म्हटले आहे. शिवाय न्यायदानासाठी जे गुण आवश्यक असतात ते येथे सांगितले आहेत. न्यायधिशांची संख्याही अत्यल्प स्वरूपाचीच असावी. त्यांना मदत करण्यासाठी इतर न्यायधिशांची व्यवस्था असावी. एकंदरीत सिंधू संस्कृती मधील न्यायव्यवस्था अत्यंत प्रगत हेती. मा. म. देशमुख म्हणतात, ‟उत्खननात नगरांत सापडलेल्या विशाल इमारतीवरून नगरांचा कारभार पाहण्यासाठी नगराधिपती असावा व या इमारतीत त्यांचे निवासस्थान व कार्यालय असावे.” यावरून त्या नगरांसाठी स्थानिक न्यायव्यवस्था अस्तित्वात असावी जी की नगराधिपती यांचेकडे सोपविलेली असावी. सिंधु संस्कृतीत उत्तर नगररचना असे सूचित करते की त्याकाळी बांधकाम खाते अस्तित्वात असावे तसेच न्यायखाते देखील अस्तित्वात असावे. रा. श्री. मोरवंचिकर म्हणतात, ‟समाजात धर्माचे प्रतिनिधीत्व करणारा पुरोहितवर्ग हा प्रधान असला पाहिजे समाजात त्याचे स्थान दुहेरी महत्वाचे असले पाहिजे. तो म्हणेल तो धर्म आणि तोच कायदा असला पाहिजे.” यावरून सिंधू संस्कृतीतील न्यायव्यवस्था धर्माधिष्ठीत होती तसेच पुरोहितांकडे न्याय खात्याचा कारभार सोपविलेला असावा.

सिंधू संस्कृतीनंतरचा कालखंड हा वैदिक संस्कृतीचा मानला जातो. वैदिक संस्कृतीचे विभाजन चार कालखंडात केले जाते. ऋग्वेदकाल, ब्राम्हणकाल, उपनिषदकाल, महाकाव्य व पुराणे या कालखंडाचा प्रारंभ आणि शेवट कधी झाला हे निश्चित सांगता येत नाही. कालावधी बाबत मोठ्या प्रमाणात मतभेद आहेत. वैदिक कालखंडातील समाज जीवन परिपक्व स्वरूपाचे दिसून येते. त्यामुळे वैदिक कालखंडातील न्यायव्यवस्था देखील विकसित झालेली दिसून येते. वैदिक लिखाणात जाती व्यवस्थेचे समर्थन करण्यात आलेले आहे. तसेच राजकीय विचारांची माहिती देखील आढळते. ऋग्वेद आणि अथर्ववेदात शासन, राजकारण विशेषतः राजसत्तेबाबत मोठ्या प्रमाणात विवेचन केलेले आहे. वैदिक कालखंडानंतर सामाजिक राजकीय स्थित्यंतराला सुरूवात झाली या स्थित्यंतरानंतर नवीन राजकीय व्यवस्था निर्माण झाली त्याचाही उल्लेख वैदिक साहित्यातून सापडतो. प्राचीन भारतातील न्यायव्यवस्थेच्या अभ्यासासाठी स्मृतीग्रंथ हा सर्वात महत्वाचा स्त्रोत आहे. वैदिक तत्वज्ञान, उत्तरवैदिक तत्वज्ञान, ब्राम्हण साहित्य, महाकाव्य, रामायण, महाभारत, शांतीपर्व, जातककथा व पिटक साहित्य, पाणिनीचे लिखाण, मनुस्मृती, उपनिषद, जैनधर्म ही महत्वपूर्ण प्राचीन न्यायव्यवस्थेची साधने, स्त्रोत आहेत.

पूर्व ऋग्वेद काळातील राजकीय जीवनपध्दती अत्यंत परिपक्व स्वरूपाची होती. राज्यकारभाराच्या सोयीसाठी राज्यात अनेक विभाग पाडलेले असत. मात्र स्वतंत्र असा न्यायविभाग दिसून येत नाही. राजाला अनेक कार्य करावी लागत असत. न्यायदान करण्याचे कार्यसुध्दा राजाला करावे लागत असे. राजा हा आपल्या राज्यातील सर्वोच्च न्यायाधीश होता. म्हणजेच राजाच्या हातात राज्यातील तिन्ही विभाग होते. त्यावर त्याचे प्रत्यक्ष नियंत्रण होते. कायदेविषयक सत्ता, कार्यकारी सत्ता, न्यायसत्ता राजाच्या अधिकारात येत असे. राजाच राज्याचा सरन्यायाधीश म्हणून काम करीत असे. ‟तो फौजदारी व दिवाणी या दोन्ही प्रकारच्या दाव्यांचा निकाल लावीत असे.” याचा अर्थ असा नव्हे की सर्वच दाव्याचा निकाल राजा देत असे ठराविक आणि अतिमहत्वाच्या दाव्यांमध्ये राजा निकाल देत असे, राजा न्यायालयीन कामकाज पहात असताना त्याच्या कार्यात पुरोहित मदत करी. हा पुरोहित राजाला न्यायदानात तांत्रिक स्वरूपाची मदत करीत असल्यामुळे न्यायव्यवस्थेत त्याचे वजन वाढलेले होते. हा पुरोहित काही अंशी आपला प्रभाव राजावरही पाडीत असे एकंदरीत राजा आणि पुरोहित हेच न्याय व्यवस्थेत प्रमुख होते. राजा गुन्हेगारांना कठोर शासन करीत असे त्यासाठी तो दण्ड धारण करीत असे, ‟पण तो स्वतः मात्र अदण्ड असे.” राजाला त्याच्या चुकांसाठी कोणीही दंड करू शकत नसे. राजा हा सार्वभौम असे तरीही या कालखंडातील न्यायव्यवस्थेचा उद्देश हा सुधारणात्मक व आदर्शवादी होता. ऋग्वेदात न्यायदानासाठी जी नियमावली तयार करण्यात आली होती तिला ‟धर्मत” असे म्हटले जात असे. ऋग्वेदात फौजदारी व दिवाणी अपराधांचाही उल्लेख सापडतो. कठोर अपराधासाठी अपराध्याला मृत्यूदंड दिला जाई. पण शक्यतो शारीरिक दंड मोठ्या प्रमाणावर दिला जाई. त्याकाळी शारीरिक शिक्षेवर अधिक भर दिलेला दिसून येतो. एखाद्या व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीचा एखादा अवयव जायबंदी झाल्यास तसाच त्याचा अवयव जायबंदी करण्याची शिक्षा दिली जात असे. अपवादात्मक गुन्हयात मृत्यूदंड दिला जाई. त्या काळातील न्यायदानाची व्यवस्था अगदी शेवटच्या स्तरापर्यंत म्हणजे छोटया मोठया गावांत देखील अस्तित्वात होती. ‟तैतरिय संहितेत ग्रामीण न्याधिशास ग्रामवा-दिन म्हटले आहे.” त्या काळात ग्रामीण भागातही न्यायालये अस्तित्वात होती. आपल्या देशात गावात तर सोडाच अनेक तालुक्यात न्यायालये नव्हती.

पूर्व ऋग्वेद कालखंडानंतरचा कालखंड किंवा वैदिक संस्कृतिची द्वितीय अवस्था म्हणजे ब्राम्हणकाळ (उत्तर वैदिक काळ) या नावाने ओळखला जातो. या काळातील शासन व्यवस्था आणि ऋग्वेदकालीन शासनव्यवस्था यामध्ये फारसा फरक आढळत नाही. ब्राम्हणकाळातही शासन व्यवस्था सुरळीत चालण्यासाठी शासनाचे विभाग पाडले असले तरी स्वतंत्र अशी न्यायव्यवस्था आढळत नाही. न्यायदानाचे कामकाज सभा, समिती आणि राजा यांच्याद्वारे होत असे. राजा हा सर्वोच्च न्यायाधीश होता. राजा हा अंतिम न्यायदानाचे कार्य करीत असे त्याला न्यायदानाच्या कार्यात सभेतील सभासद व पुरोहितवर्ग मदत करी असे. राजा जरी सर्वोच्च न्यायाधीश असला तरी सभेचे त्यावर नियंत्रण असे.



Scanned with OKEN Scanner

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | ISSN- 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) –0.676 Special Issue – 130 (B) | April 2019 | UGC Approved No. 40705

च्सभेचे प्रमुख कार्य न्यायदान हे होते. ती नागरिकांची न्यायपंचायत असावी.छ तसेच, च्सभेमध्ये जाताना राजाने ब्राम्हण अथवा मंत्री ठेवणे आवश्यक होते. न्यायदान करणे राजाचे कर्तव्य मानले जाई.छ यावरून राजा सार्वभौम असला तरी विविध प्रकारच्या न्यायदानात त्याला सभा व समितीचा सल्ला हा बंधनकारक होता. सभेपेक्षा मोठी संस्था समितीची होती. ही समिती सर्व प्रकारची ध्येयधोरणे कायदे यांच्यावर चर्चा करून आपला निर्णय देत असे. त्यांचा राजाला गांभिर्याने विचार करावा लागत असे. कारण जुलमी, अन्यायी, नालायक राजाला पदभ्रष्ट करण्याचा व योग्य व्यक्तिला राजपदावर बसवण्याचा अधिकार समितीला होता. त्यामुळे राजाच्या न्यायदानाच्या कार्यावर समितीच्या काही मर्यादा पडत असत. ब्राम्हण काळातील न्यायव्यवस्था अगदी छोटया गावापर्यंत काम करीत होती. खेडयातील भांडणांचा निकाल घ्राम्यावधिनङ नामक अधिकारी लावित असे. त्याकाळी गंभीर गुन्हयांसाठी फाशीची शिक्षा दिली जाई. शिवाय फौजदारी व दिवाणी दावे असे वर्गीकरणही केले जात होते. च्वारसा हक्क, जमीन मालकी, कर्ज वगैरे दिवाणी दाव्यांचा निकाल राजा देत असे.छ दिवाणी व फौजदारी खटल्यांचा निकाला देताना फौजदारी व दिवाणी या दोन्ही प्रकारच्या दाव्यात साक्ष पुरावा होवून निवाडा देण्यात येई. यावरून असे स्पष्ट होते की वैदिक कालखंडातील न्यायव्यवस्था अधिक संघटित स्वरूपाची होती. राजावर सभा व समिती यांचे नियंत्रण असले तरी कालांतराने विशाल साम्राज्याची निर्मिती होऊन शक्तीशाली सम्राटांचा उदय झाला आणि लोकमताचे प्रभावी असे नियंत्रण राजावर राहिले नाही. पूर्वी राजाच्या न्यायदानावर जे नियंत्रण होते ते नियंत्रण शक्तिशाली सम्राटांच्या उदयामुळे राहिले नाही. राजाचेच न्याययंत्रणेवर वर्चस्व प्रस्थापित होऊन न्यायव्यवस्था राजाच्या अधिन झाली. या काळात राजे लोक राजवाडयात सिंहासनावरून न्यायदान करीत असल्याचा उल्लेख आहे.

वैदिक काळातील अथवा प्राचीन काळातील न्यायव्यवस्था सुव्यवस्थित असली तरी खऱ्या अर्थाने स्मृत्यांच्या काळात न्यायव्यवस्थेचा विकास अधिक प्रमाणात झाला म्हणून न्यायव्यवस्थेच्या विकासात स्मृत्यांचे योगदान महत्वपूर्ण मानावे लागते. मनु, कौटिल्य, याज्ञवल्क्य, शुक्र यांनी न्यायव्यवस्थेच्या विकासात महत्वपूर्ण योगदान दिले. भारतीय पुराणामधूनही न्यायव्यवस्थेचे दर्शन होते. च्व्यासाद्वारे रचित जी 18 पुराणे महापुराणाच्या नावे प्रसिध्द आहेत त्यात न्यायव्यवस्थे संबंधी तरतुदी सापडतात.छ या काळात राजा न्यायदान करीत असताना वेगळा पोशाख परिधान करीत असे. व इतर कामकाजात वेगळा पोशाख परिधान करीत असे. आजही न्यायधिशांना न्यायदानाच्या वेळी विशिष्ट पोशाख परिधान करावा लागतो. याकाळात राजा म्हणजे सर्वोच्च न्यायाधीश असल्यामुळे त्याच्याकडून समान न्यायाची अपेक्षा मोठ्या प्रमाणात केली जात असे. याबाबत नारद लिहितात, च्न्यायाधीशाच्या आसनावर बसलेल्या राजाने सर्वांना समान दृष्टीने पाहिले पाहिजे.छ राजाने कुठल्याही मोह, माया यामध्ये अडकून न पडता त्याने यमाच्या कार्याप्रमाणे न्यायदानाचे कार्य करावे. अशीच अपेक्षा केली जात होती. राजा न्यायदान करीत असताना त्याने विद्वान लोकांचा सल्ला घेतलाच पाहिजे असे बंधन घालण्यात आले होते कारण राजा सुध्दा एक मानवच होता. त्याच्याकडूनही काही तांत्रिक चुका होऊशकतात. सर्वच बाबतीत राजाला त्या त्या क्षेत्रातील विद्वानांचा सल्ला घेणे आवश्यक असे. त्यांच्या सल्ला मसलतीमधूनच राजा न्यायदानाला चालना देत असे. जो राजा अशा निःपक्षपातीपणाचा अवलंब न करता न्यायदान करील, च्त्याला नरकाची प्राप्ती होईल.छ असे भय स्मृतीकरांनी राजाला दाखवलेले होते. यावरून राजा जरी सार्वभौम असला तरी न्यायदान मात्र सल्ला मसलत करूनच करीत असे. त्यामुळे न्यायालयीन स्वातंत्र्य अबाधित राहण्यास मदत होई. त्या काळची न्यायव्यवस्था एकंदरीत नियंत्रित स्वरूपाची होती मात्र कोणा एकाचे वर्चस्व न्यायव्यवस्थेवर नव्हते. राज्याच्या अन्य क्षेत्रात क्षेत्रीय न्यायालयांची निर्मिती केल्याचा उल्लेख सापडतो. त्यांच्या संख्येबाबत व नावासंदर्भात भिन्नता दिसून येते. प्राचीन काळातील स्त्रोतात जी नावे मिळतात ती कुल, श्रेणी, पुग, गण या स्वरूपात मिळतात तर मनु त्यांची नावे व क्रम, जाती, जनपद, श्रेणी अथवा कुल या स्वरूपात स्पष्ट करतो. यावरून याही काळात न्यायालयांची उतरंड दिसून येते. खालच्या न्यायालयातून दिलेल्या निर्णयावर वरच्या न्यायालयात अपील करता येत होते. शेवटी राजाच्या न्यायालयांपर्यंत जाण्याचा त्या काळी अधिकार होता हे स्पष्ट होते. या अपिलिय अधिकारामुळे न्यायालयीन स्वातंत्र्याची जोपासना होत होती. या अपिलीय अधिकारामुळे आपोआपच अन्यायाला वाचा फोडण्याचे काम न्यायालयाद्वारे होत असे, तसे त्या काळात पुनर्निर्णय न्यायदान पध्दतही अस्तित्वात होती. असे अपील खालच्या न्यायालयाविरूध्द राजाकडे करता येत असे अशा न्यायदानाच्या वेळी राजा, च्अधिक योग्य सदस्याबरोबर विवाद पहात असे.छ राजा आपल्या आवश्यकतेनुसार खालच्या न्यायालयांची निर्मिती करून त्याद्वारे तो न्यायदान करीत असे. त्याकाळात जनतेची देखील न्यायालये होती. त्यांना ग्रामीण भागातील विवादांचा निर्णय करण्याचा अधिकार होता. त्याकाळी न्यायधिशांच्या पात्रतेवर अधिक भर दिला जाई. जेथे जेथे तांत्रिक बाबींची आवश्यकता निर्माण होई तेथे तेथे विशेष तज्ञांची नियुक्ती करून न्यायदानाला चालना दिली जाई.

भारतातील प्राचीन न्यायव्यवस्था देखील एखाद्या पिरॅमिड प्रमाणे दिसून येते. तसेच ती एकात्म देखील आहे. खालच्या न्यायालयाच्या निकालाविरूध्द वरच्या न्यायालयात अपील करता येत असे. च्कुलाच्या निर्णयावर श्रेणी न्यायालय समीक्षण करू शकत असे. श्रेणी न्यायालयाच्या निकालावर समीक्षण करण्याचा अधिकार गण न्यायालयास असे. न्यायधिशांना गण न्यायालयाने दिलेल्या निकालावर समीक्षणाचा अधिकार असे. राजा हा सर्वोच्च अपील न्यायालय असे ज्याचा निर्णय अंतिम स्वरूपाचा असे.छ खालच्या स्तरावरील न्यायालयांना शारीरिक व अर्थिक दंड देण्याचा अधिकार नव्हता. मात्र काही वरीष्ठ न्यायालयांना व राजाला शारीरिक दंड व अर्थिक दंड देण्याचा अधिकार होता. प्राचीन न्यायव्यवस्थेचा उगम मानवी समुहातून होऊन वैदिक काळापर्यंत तिचा विकास मोठ्याप्रमाणात झाला तसेच स्मृतींच्या काळातील न्यायव्यवस्था खूपच विकसित झालेची होती.

**उद्दिष्टये**

- प्राचीन न्यायव्यवस्थेचा अभ्यास करणे.
- न्यायव्यवस्थेच्या धर्माधिष्ठीततेचा अभ्यास करणे



Scanned with OKEN Scanner

- जातीनिहाय न्यायव्यवस्थेचा अभ्यास करणे

**गृहितक**

1. प्राचीन न्यायव्यवस्था रानटी होती.
2. प्राचीन न्याय व्यवस्था धर्माधिष्ठीत होती.
3. प्राचीन न्यायव्यवस्थेत जाती वर्ण व्यवस्थेनुसार न्यायदान केले जात होते.

**तथ्यसंकलन**

सदरील संशोधनामध्ये दुय्यम स्त्रोताचा वापर करण्यात आला आहे. यामध्ये वृत्तपत्रे, ग्रंथ, इंटरनेट इ.

**निष्कर्ष**

1. न्याय ही संकल्पना मानवी समुहाशी संबंधित आहे.
2. भारतातील प्राचीन न्यायव्यवस्था रानटी स्वरूपाची आढळते.
3. प्राचीन न्यायव्यवस्थेचा संबंध धर्मसंकल्पनेशी जोडलेला आढळतो.
4. भारतीय न्याय व्यवस्थेचा विकासात प्राचीन न्यायव्यवस्थेचा महत्वपूर्ण वाटा आहे.
5. प्राचीन न्यायव्यवस्थेची व्याख्या निश्चित आढळत नाही.

**संदर्भग्रंथ**

1. देशमुख, मा. म., 1999, घ्प्राचीन भारताचा इतिहासङ, विश्वभारती प्रकाशन, नागपूर, पृष्ठ क्र. 39
2. शर्मा, अंजु, 2001, घ्प्राचीन भारत मे न्यायिक प्रणालीङ, श्याम प्रकाशन, जयपूर, पृष्ठ क्र. 23
3. भनोत, बेला, 1999, घ्भारत में न्याय प्रशासनङ,पोईन्टर पब्लिशर्स, जयपूर, पृष्ठ क्र.40
4. नाटाणी, प्रकाश नारायण, 2004, घ्भारत में न्याय पालिकाङ, अविष्कार पब्लिशर्स, जयपूर, पृष्ठ क्र. 4
5. फडके, य. दि. 2006, घ्समान नागरी कायदाङ, अक्षर प्रकाशन, पृष्ठ क्र. 42
6. देशमुख, मा. म., 2003, घ्मध्ययुगीन भारताचा इतिहासङ, विश्वभारती प्रकाशन, नागपूर, पृष्ठ क्र. 70

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani



Scanned with OKEN Scanner